सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२१–२२/२०२ दिनांक १८/०२/२०२२

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व <u>व्यावसायिक</u> महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय** : भारताच्या ७५ व्या स्वातंत्र वर्धापन दिनाच्या अनुषंगाने आझादी का अमृत महोत्सव या शिर्षाखाली केंद्र शासनाच्या वतीने "National Intellectual Property Awareness Mission" (NIPAM) हा कार्यक्रम महाविद्यालयात संस्थांमध्ये राबविणेबाबत.

**संदर्भ** : तंशिविकापु/विवि–४/ NIPAM/२०२२/५५१ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, केंद्र शासन संचलित पेटंट्स कार्यालय, मुंबई यांचेकडून विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये "Intellectual Property Right" याबाबत जनजागृती करण्यासाठी मोहिम आयोजित केली आहे. या करिता तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडून ऑनलाईन/ऑफलाईन कार्यशाळा तसेच वेबीनार आयोजित करण्यात येणार आहे.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या महाविद्यालयामध्ये ऑनलाईन/ऑफलाईन कार्यशाळा तसेच वेबीनार आयोजनाबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रात नमूद केल्या नुसार आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याकरिता संबंधितांना सूचित करावे ही विनंती, कळावे.

सोबत : वरीलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि-४/NIPAM/२०२२/ 551 दिनांक : 03 FEB 2022

प्रति,

अ) **कुलसचिव,**
१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,
२) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर,
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे. जि. रायगड

ब) **संचालक / प्राचार्य,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय /
अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्य वर्धापन दिनाच्या अनुषंगाने आझादी का अमृत महोत्सव या शिर्षाखाली केंद्र शासनाच्या वतीने "National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)" हा कार्यक्रम महाविद्यालयात संस्थांमध्ये राबविणेबाबत**

संदर्भ :- No.2022/IPOM/NIPAM/SBP/2719, Dated 25.01.2022.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सुलभ संदर्भासाठी त्याची प्रत सोबत जोडली आहे. प्राप्त पत्रास अनुसरुन, आपणास सूचित करण्यात येते की, केंद्र शासन संचलित पेटंट्स कार्यालय, मुबई याचेकडून विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये **"Intellectual Properties"** उदा. **Patents, Designs, Trademarks, Copyrights, and Geographical Indications** याबाबत जनजागृती करण्याकरीता मोहिम आयोजित केली आहे. याकरीता वर नमूद केलेल्या कार्यालयाकडून ऑनलाईन / ऑफलाईन कार्यशाळा तसेच वेबीनार प्रत्येक संस्थेत आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या नवनिर्माण कल्पना, नाविण्यपूर्ण किंवा त्यांच्यामध्ये असणा-या वैविध्यपूर्ण संकल्पनांचे संवर्धन करण्याकरीता हा उपक्रम निश्चितच उपयोगी पडणार आहे. हे नाविण्यपूर्ण उपक्रम भारताच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त सादर करण्यात येणा-या **"आझादी का अमृत महोत्सव"** या शिर्षाखाली होणा-या **"Intellectual Property Rights"** याबाबतच्या जनजागृती योजना देशातील १० लक्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा मानस पेटंट कार्यालयाने व्यक्त केला आहे.

सबब या विभागातील सर्व संस्थांनी या उपक्रमामध्ये **कोविड-१९ च्या नियमांचे पालन करुन** व सहभाग घेवून आपल्या महाविद्यालयामध्ये कार्यशाळा / वेबीनार आयोजित करण्याकरीता सदर पेटंट कार्यालयास सहकार्य करुन उपकृत करावे. याकरीता सोबत जोडलेल्या श्री. सागर बाबुराव पोळ, **Assistant Controller of Patents & Designs, Patent Office, Mumbai** यांचेशी पत्रात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेलवर सर्व महाविद्यालयांनी (संस्थांनी) संपर्क साधून आपल्या कार्यशाळेचा नियोजित दिनांक व वेळ ठरविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : संदर्भिय पत्राची प्रत

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १) श्री.. सागर बाबुराव पोळ, असिस्टंट कंट्रोलर ऑफ पेटंट्स ॲण्ड डिझाईन्स, पेटंट ऑफिस, बौध्दिक संपदा भवन, ॲन्टॉप हिल मुख्य पोस्ट ऑफिस जवळ, एस. एम. रोड, ॲन्टॉप हिल, मुंबई - ४०००३७ यांना माहितीस्तव अग्रेषित.
२) या कार्यालयातील प्रोग्रामर यांना, संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

INTELLECTUAL
PROPERTY **INDIA**
PATENTS/
DESIGNS/TRADEMARKS/
GEOGRAPHICAL
INDICATIONS.

सत्यमेव जयते
Government of India
Patent Office, Mumbai
Boudhik Sampada Bhavan
Near Antop Hill Head Post Office,
S. M. Road, Antop Hill,
Mumbai - 400037, India.

(Tel): 022 24159194
91-9421203974

(Email): sagarbp.ipo@nic.in

(Website): www.ipindia.nic.in

No: 2022/IPOM/NIPAM/SBP/2719

Date: 25/01/2022

To,

Dr. D.V Jadhav,

Joint Director, Technical Education Regional Office, 412-E, Shivaji Nagar, Buhirat Patil Chowk, Pune- 411016.

Dear Sir,

This is in reference to conducting a seminar/webinar in your regional institutes. Our Nation is commemorating the 75th Anniversary of India's Independence under the banner of "Azadi ka Amrit Mahotsav". Under this banner Department for Promotion of Industry and Internal Trade, Government of India has launched the "National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)". The pan-India ambitious mission aims to provide awareness on Intellectual Property Rights to 1 million students.

The mission aims to aware the students about Intellectual Properties such as Patents, Designs, Trademarks, Copyrights and Geographical Indications. This awareness program will inspire the students of your regional institutes to innovate and protect their creations.

We humbly seek your cooperation in taking forward the mission (NIPAM). A line in confirmation on the above said proposal is highly appreciated.

Thanking you.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
02 FEB 2022
आवक क्र....9989

Regards,

25/01/2022

Sagar Baburao Pol
Assistant Controller of Patents & Designs
Patent Office – Mumbai
(NIPAM- Team Leader)

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.विससं/उशि/कोविप/२०२२-२३/ 266 दिनांक: ०१/०२/२०२२

प्रति,

अ) कुलसचिव,

१.मुंबई विद्यापीठ, मुंबई

२.एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

३ अमेटी विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड.

४.छत्रपती शिवाजी महाराज, विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड.

५.विजयभूमी विद्यापीठ, कर्जत, जि.रायगड.

ब) प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित,

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, शारीरिक शिक्षण व आदर्श महाविद्यालये, .

जि.रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर..

**विषय :- भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्य वर्धापन दिनाच्या अनुषंगाने "आझादी का अमृत महोत्सव" या शिर्षाखाली केंद्र शासनाच्या वतीने "National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)" हा कार्यक्रम महाविद्यालयात राबविणेबाबत.**

**संदर्भ:** - क्र. २०२२ आयपीओएम/एनआयपीएम/एसबीपी/२७१४ दि२५/१/२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन केंद्र शासन संचलीत पेटेंटस कार्यालय मुंबई यांचेकडून विदयार्थी व शिक्षक यांच्यामध्ये **"Intellectual Properties"** उदा **Patents, Designs, Trademarks, Copyrights, and Geographical Indications.** या बाबत जनजागृती करण्याकरिता मोहिम आयोजित केली आहे. या करिता वर नमूद केलेल्या कार्यालयाकडून ऑनलाईन/ऑफलाईन कार्यशाळा तसेच वेबीनार प्रत्येक महाविदयालयामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमामुळे विदयार्थ्यांमध्ये त्यांच्या नवनिर्माण कल्पना, नावीन्यपूर्ण किंवा त्यांच्यामध्ये असणा-या वैविध्यपूर्ण संकल्पनांचे संवंधन करण्याकरिता हा उपक्रम निश्चितच उपयोगी पडणारा आहे. या नाविण्यपूर्ण उपक्रम भारताच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त सादर करण्यात येणा-या **"आझादी का अमृत महोत्सव"** या शिर्षाखाली होणा-या **"Intellectual Property rights"** या बाबतच्या जनजागृती योजना देशातील १० लक्ष विदयार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा मानस पेटंट कार्यालयाने व्यक्त केला आहे.

करिता या विभागातील सर्व महाविदयालयांनी या उपक्रमामध्ये सहभाग घेवून आपल्या महाविदयालयामध्ये **कार्यशाळा/वेबीनार कोविड-१९ च्या नियमांचे** पालन करुन आयोजित करण्याकरिता सदर पेटंट कार्यालयास सहकार्य करुन उपकृत करावे, या करिता सोबत जोडलेल्या **श्री.सागर बाबूराव पोळ, Assistant Controller of Patents & Designs, Patents office, Mumbai** यांच्याशी पत्रात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल वर सर्व महाविदयालयांनी संपर्क साधून आपल्या कार्यशाळेची नियोजीत वेळ व दिनांक ठरविण्यात यावा, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

(डॉ.संजय जगताप)

विभागीय सहसंचालक